# तिफण

वर्ष : १४ वे । अंक ४ था
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च - २०२३
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal



## यशवंतराव चव्हाण
## विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १४ वे, अंक - ४ था

जानेवारी - फेब्रुवारी - मार्च २०२३

भाग - २

**UGC Care Listed Journal**
**ISSN 2231 - 573X**

◆ संपादक ◆

**डॉ. शिवाजी हुसे**

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार' श्रीराम कॉलनी,हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३, मो. ९९०४००३९९८

UGC Care Listed Journal, ISSN 2231 - 573X

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/2009 - TC

वर्ष १४ वे, अंक - ४ था जानेवारी - फेब्रुवारी - मार्च २०२३

## यशवंतराव चव्हाण विशेषांक

◆ संपादक ◆

डॉ. शिवाजी हुसे

◆ अतिथि संपादक ◆

प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे

डॉ. राजकुमार मरे

◆ संपादक मंडळ ◆

डॉ. सर्जेराव जिगे
डॉ. सुभाष बागल
डॉ. सुभाष शेकडे
डॉ. राजकुमार मुसणे
डॉ. ताहेर पठाण
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. सुखदेव इगारे
डॉ. सुधाकर जाधव
डॉ. दिलिप बिरुटे
डॉ. दत्तात्रय डुंबरे
डॉ. प्रेमला मुखेडकर
डॉ. रंजना कदम

मूल्य : २५० रुपये

या अंकातील लेखकांच्या संपादक सहमत असतीलच असे नाही, या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार' श्रीराम कॉलनी,हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद - ४३१४०३, मो. ९९०४००३९९८

# भाग - २ अनुक्रमणिका



| अनु क्र. | लेख व लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | यशवंतराव चव्हाण यांची ऐतिहासिक वाटचाल आणि त्यांची भाषणे<br>**डॉ. सोमनाथ दत्तात्रय कदम** | ७९-८४ |
| १४ | यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कारकीर्दीचा महाराष्ट्राच्या अनुषंगाने अभ्यास<br>**श्री. जमादार फिरोझखान इमाम** | ८५-८९ |
| १५ | यशवंतराव चव्हाण यांचे कृषीविषयक विचार<br>**आकाश संभाजी ढोले**<br>**डॉ. सुनिल अण्णा गोरडे** | ९०-९४ |
| १६ | संयुक्त महाराष्ट्र चळवळ व यशवंतराव चव्हाण<br>**डॉ. भेलोंडे जगदीश व्यंकटराव** | ९५-९८ |
| १७ | यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचे कृषी व सहकार विषयक विचार व कार्य<br>**डॉ. महेंद्र केरबा गजधानेद्य** | ९९-१०१ |
| १८ | महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्था आणि यशवंतराव चव्हाण<br>**प्रा. डॉ. आर. बी. वनारसे** | १०२-११० |
| १९ | यशवंतराव चव्हाण यांचे शेती आणि विकासातील योगदान<br>**डॉ. सुनिल अण्णा गोरडे** | १११-११६ |
| २० | यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या कृषी, उद्योग व आर्थिक विकासात योगदान<br>**डॉ. वाघमारे माणिक एस.** | ११७-१२१ |
| २१ | शैक्षणिक परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षण विषयक विचार व कार्य<br>**श्रीमती भारती श्याम पाटील** | १२२-१२७ |
| २२ | यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्रातील शैक्षणिक विकासातील योगदान<br>**डॉ. विजया जितेंद्र राऊत** | १२८-१३५ |
| २३ | यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक व आर्थिक विचार<br>**डॉ. भगवान सांगळे** | १३६-१३९ |
| २४ | यशवंतराव चव्हाण यांची शिक्षणविषयक भूमिका आणि कार्य<br>**डॉ. जनार्दन श्रीकांत जाधव** | १४०-१४७ |
| २५ | यशवंतराव चव्हाण व त्यांची राजकीय वाटचाल<br>**सविता भिवा धनवडे** | १४८-१५१ |



# १९. यशवंतराव चव्हाण यांचे शेती आणि विकासातील योगदान

**डॉ. सुनिल अण्णा गोरडे**
संशोधन मार्गदर्शक आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड, तालुका - कन्नड, जिल्हा - औरंगाबाद.

**प्रस्तावना**

गोवंश बंदी विधेयकाच्या संदर्भातील आर्थिक दृष्टिकोन, कुळ कायद्याची अंमलबजावणी, कमाल जमीन धारणा कायदा, महाराष्ट्र सहकार कायदा, बँकाच्या राष्ट्रीयकरणा संदर्भातील भूमिका, शेती आणि गरजेच्या उद्योगांसाठी कर्ज पुरवठ्यात वाढ, कृषी मालाच्या निर्यातीसाठी प्रोत्साहन, कर्ज पुरवठा आणि कृषी मालाच्या भाववाढी वरती नियंत्रण, शेतीसाठी पाणी आणि विजेची उपलब्धता, करविषयक धोरण आणि कृषी विकास, नियोजना संदर्भातील विचार, कृषी शिक्षणाला प्राधान्य या संदर्भात यशवंतराव चव्हाण यांनी घेतलेली भूमिका आणि मांडलेले विचार यातून त्यांचे शेती आणि विकासातील योगदान स्पष्ट करता येते. डॉ. विजय पाध्रीकर यांच्यामते, यशवंतराव चव्हाण यांनी 38 वर्ष सत्तेत राहून आपल्या दूरदृष्टीच्या कर्तुत्वान कृषी संस्कृतीला मानाचे स्थान प्राप्त करून दिले. भारतामध्ये आज वंचितांची आणि शेतकऱ्यांची मुलं आत्मविश्वासाने मोठ्या पदावर कार्यरत आहे साहेबांच्या ध्येय धोरणांचं हे फळ आहे.

**गोवंश बंदी विधेयक**

1953 मध्ये यशवंतराव चव्हाण मुंबई राज्याचे पुरवठा मंत्री असताना सदरील विधेयक विरोधी पक्ष सदस्यांनी विधानसभेत मांडले होते. आर्थिक दृष्टिकोनातून सदरील विधेयक अव्यवहार्य असल्याचे त्यांनी आपल्या भाषणातून स्पष्ट केल्याचे दिसून येते. त्यांनी विधिमंडळामध्ये केलेल्या भाषणांमध्ये चार वर्षांपूर्वी दुभत्या जनावरांच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी सरकारने नेमलेल्या कमिटीच्या संशोधन अहवालाची मांडणी केली. या संशोधन अहवालानुसार दहा टक्के जनावरे म्हणजे सुमारे एक कोटी चाळीस लक्ष जनावरे असे आहेत की, ज्यांचा उत्पादनाच्या दृष्टीने किंवा शेतीच्या कामाच्या दृष्टीने काही उपयोग नाही. अर्थात अशा प्रकारची जनावरे या देशातील शेतीच्या धंद्यावर एक प्रकारचा बोजा आहे. कडबा किंवा चाऱ्यासाठी लागणाऱ्या वस्तूवर जवळजवळ शंभर कोटी रुपयांचा खर्च होत असून शेतीच्या दृष्टीने हा मोठा बोजा होऊन बसला आहे. अशा परिस्थितीत या प्रश्नाचा आर्थिक दृष्टीने विचार करून धार्मिक किंवा सांस्कृतिक प्रश्न उभे करू नये ही बाब त्यांनी स्पष्ट केल्याचे दिसून येते. यशवंतराव चव्हाण यांच्यामते, शेतीसाठी उपयुक्त असणारी आणि उत्पादनाच्या दृष्टीने उपयुक्त असणारी जनावरे असतील, त्यांना मारली जाऊ नये त्यांची जेवढी काळजी घेता येईल तेवढी घ्यावी. आपल्या देशातील लोकांच्या मनात गोमातेबद्दल पवित्र भावना आहे परंतु ज्यांना गाई पाळाव्या लागणार आहेत त्यांच्या अडचणीचा विचार या बिलाच्या अनुषंगाने केला गेला पाहिजे. या विधेयकाच्या संदर्भात आर्थिक दृष्टिकोन महत्त्वाचा आहे या

बाबीकडे यशवंतराव चव्हाण यांनी लक्ष वेधले. सरकारच्या वतीने या बिलाला विरोध केला. श्री पुरुषोत्तमभाई पटेल यांनी मांडलेले बिल परत घ्यावे अशी विनंती यशवंतरावांनी केली. शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताला बाधा येऊ नये हा दृष्टिकोन त्यातून दिसून येतो.

महाराष्ट्र मध्ये 'महाराष्ट्र प्राणी संवर्धन (सुधारित) 2015' या कायद्याने वळू, वासरे, देशी गायी व देशी बैलांचे संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने या कायद्याचे अंमलबजावणी केल्याचे दिसून येते. या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणीमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. अनुत्पादक व निकामी झालेले जनावर बाजारात विकून दुसरे जनावर विकत घेण्याची शेतकऱ्यांची पद्धत बंद झाली. या कायद्यामुळे शेतकऱ्यांचे होत असलेले आर्थिक नुकसान भरून निघण्याची समाधानकारक पद्धत दिसून येत नाही. या कायद्यामुळे शेतकरी बैल पाळण्याऐवजी मशागतीसाठी ट्रॅक्टरला प्राधान्य देत असल्याचे दिसून येते. जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील सेंटर फॉर इकॉनॉमिक स्टडीज अँड प्लॅनिंग चे सहयोगी प्राध्यापक विकास रावल यांच्या अंदाजानुसार गोवंश हत्या बंदीच्या निर्णयामुळे अनुत्पादक जनावरांच्या पोषणाची समस्या निर्माण होईल. देशामध्ये दरवर्षी 3.4 कोटी नर गोवंश जन्माला येतात व त्यांच्या पालनपोषणासाठी 5.4 कोटी खर्च येतो. या बाबींची सोडवणूक होण्याची आवश्यकता आहे. केंद्र सरकारच्या ऍनिमल हजबंडरी विभागाकडून देण्यात आलेल्या आकडेवारीनुसार ज्या राज्यात हा कायदा करण्यात आलेला आहे अशा राज्यातील गायी व बैलांची संख्या सर्वात वेगाने कमी झाली आहे. तसेच ज्या राज्यात हा कायदा लागू करण्यात आलेला नाही अशा राज्यात गायी व बैलांच्या संख्येत वाढ झालेली आहे. यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच्या कालावधीमध्ये विधिमंडळाच्या भाषणांमध्ये गोवंश बंदी विधेयकाला केलेला विरोध त्यांच्या विचारातील सखोलता स्पष्ट करत असल्याचे दिसून येते. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या गोवंश बंदी विधेयकाचा फेरविचार होण्याची आवश्यकता दिसून येते.

**कुळ कायद्याची अंमलबजावणी**

शेतमजुरांच्या आणि प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडवून आणणारा कुळ कायदा यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात राबविण्याचे ठरविले. कुळ कायद्याची अंमलबजावणी करून देशाला नवीन विचार देण्याचे काम यशवंतरावांनी केल्याचे दिसून येते. 1955 मध्ये भाऊसाहेब हिरे महसूल मंत्री असताना कुळ कायदा अस्तित्वात आला परंतु त्याची प्रत्यक्षामध्ये अंमलबजावणी 1 एप्रिल 1957 मध्ये माननीय यशवंतरावांनी केली. कब्जे, हक्क कुळाना देण्यात आले. यशवंतरावांच्या प्रयत्नामुळे अन्यायकारक पद्धतीचा अंत झाल्याचे दिसून येते.

**कमाल जमीन धारणा कायदा**

कसेल त्याची जमीन या धोरणाचा त्यांनी स्वीकार केला. यातूनच महाराष्ट्रामध्ये कमाल जमीन धारणा संकल्पना पुढे आली व पुढे 1961 मध्ये या संकल्पनेचे कायद्यात रूपांतर झाल्याचे आढळून येते. मोठ्या जमीनदार शेतकऱ्यांकडे असलेल्या जमिनी काढून जमीन नसलेल्यांना वाटप केल्या. यातून यशवंतरावांचा आर्थिक समानता प्रस्थापित करण्याचा दृष्टिकोन दिसून येतो.

**महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह अँक्ट**

सहकार क्षेत्राच्या विकासामध्ये भारतामध्ये 1904 आणि 1912 चा सहकार कायदा महत्त्वपूर्ण असल्याचे दिसते. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चा कायदा करण्यामध्ये आणि अंमलबजावणी मध्ये यशवंतराव चव्हाण यांचे महत्त्वपूर्ण योगदान

असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांशी संबंधित कायद्याचे एकत्रिकरण आणि सुधारणा करणे या उद्देशाने या कायद्याची अंमलबजावणी 26 जानेवारी 1962 रोजी झाल्याचे आढळून येते. भारतात सुमारे नऊ लाख सहकारी संस्था असून देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनामध्ये सहकारी संस्थांचा वाटा 20 टक्के आहे. महाराष्ट्रात साधारणपणे 2.3 लाख सहकारी संस्था असून त्यांचे पाच कोटी सभासद आहेत. महाराष्ट्रातील सहकारी संस्था या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 द्वारे नियंत्रित केल्या जातात. महाराष्ट्रामध्ये सहकारी संस्था आणि सहकारी कारखाने यांच्या विकासामध्ये यशवंतराव चव्हाण यांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे दिसते.

**बँकांचे राष्ट्रीयीकरण ठराव**

1962 मध्ये यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी महाराष्ट्र काँग्रेस प्रदेश कमिटीच्या माध्यमातून खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले पाहिजे असा ठराव करून घेतला. सर्वसामान्य लोकांचा तसेच शेती व्यवसायाचा विकास होण्यासाठी सहजपणे कर्ज पुरवठा उपलब्ध झाला पाहिजे. परंतु खाजगी बँका सर्वसामान्य लोकांना आणि शेती व्यवसायाला कर्ज पुरवठा करत नाही असे त्यांचे मत होते. जर बँका राष्ट्रीयकृत असेल तर सहजपणे शेती व्यवसायाला कर्ज पुरवठा करता येतो अशी त्यांची धारणा असल्यामुळे त्यांनी वरील ठराव केल्याचे दिसून येते. पुढे जुलै 1969 मध्ये 14 बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्याचे आपणास दिसून येते. त्यांनी स्वतः बँकांचे अध्यक्ष व डायरेक्टर यांच्याशी वर्षातून दोनदा बँकांचे गुंतवणूक धोरण पतपुरवठा या संदर्भात चर्चा केली. ग्रामीण अर्थव्यवस्थेत बँकांची कशी मदत मदत होईल व त्यांच्या शाखा सर्वत्र कशा वाढतील या बाबींची मांडणी केली.

**शेती आणि गरजेच्या उद्योगांसाठी कर्ज पुरवठ्यात वाढ**

सर्वसामान्य लोकांच्या जीवनावश्यक वस्तूंची मागणी पूर्ण होण्यासाठी गरजेच्या उद्योगाची उभारणी आवश्यक होती. कुठलाही मोठा उद्योग उभा राहण्यासाठी भाग भांडवलाची व कर्ज पुरवठ्याची आवश्यकता असते. ही गरज ओळखून यशवंतरावांनी राष्ट्रीयकृत बँकांच्या माध्यमातून गरजेच्या उद्योगांना व शेतीसाठी भरीव कर्ज पुरवठा उपलब्ध करून दिला. जून 1969 मध्ये गरजेचे उद्योग व शेतीसाठी रुपये 441 कोटी असलेला कर्ज पुरवठा जून 1973 मध्ये रुपये 1295 कोटी झाल्याचे दिसते. त्यांच्या वित्त मंत्री पदाच्या काळामध्ये गरजेचे उद्योग आणि शेती व्यवसायासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज पुरवठा झाल्याचे आढळून येते.

**कृषी मालाच्या निर्यातीसाठी प्रोत्साहन**

विकासाच्या प्रक्रियेमध्ये निर्यात या घटकाला महत्वाचे स्थान असल्याचे दिसून येते. आपल्या देशामध्ये तयार होणारा अतिरिक्त कृषीमाल आणि औद्योगिक वस्तू निर्यातीच्या माध्यमातून परकीय देशात निर्यात करता येतात व त्या माध्यमातून परकिय चलनाची प्राप्ती करता येते. निर्यात व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी मोठ्या प्रमाणात पत उपलब्ध केल्याचे आढळून येते. जून 1969 मध्ये निर्यात व्यापारासाठी रुपये 258 कोटी रुपयांची पत उपलब्ध करण्यात आली तर जून 1973 मध्ये रुपये 677 कोटी रुपयाची पत निर्यात व्यापारासाठी उपलब्ध करण्यात आली. त्यांच्या वित्तमंत्रीपदाच्या कालावधीमध्ये निर्यात व्यापारास प्रोत्साहन दिल्याचे दिसून येते.

**कर्ज पुरवठा आणि कृषी मालाच्या भाव वाढीवर नियंत्रण**

अनेक व्यापारी राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्ज घेऊन जीवन आवश्यक वस्तूचा साठा करण्याची शक्यता असते. यामुळे कृषी माल आणि औद्योगिक वस्तूंची भाववाढ होते. हे होऊ नये म्हणून यशवंतरावांनी राष्ट्रीयकृत बँकांनी कर्ज पुरवठा करत असताना कर्जाचा उद्देश काय आहे हे योग्य पद्धतीने तपासूनच कर्ज पुरवठा करावा या बाबी वरती भर दिल्याचे दिसून येते. जागतिक चलनवाढ हे भारतातील चलनवाढीचे एक प्रमुख कारण असल्याचं मत यशवंतरावांनी नोंदवल्याचं दिसून येते.

**शेतीसाठी पाणी आणि विजेची उपलब्धता**

भारताचा विकास होण्या संदर्भात नेमक्या कोणत्या अडचणी आहेत यासंदर्भात यशवंतरावांनी पुढील काही घटकांचे विश्लेषण केल्याचे आढळून येते. वीज, पाटबंधारे यांच्यावरती जो खर्च झाला त्या तुलनेत त्याचा लाभ आपणास मिळाला नाही. पूर्ण क्षमतेने पाटबंधारे वापरले जात नाही. विज उत्पादनाची योजना कमी पडत आहे, रासायनिक खतांचे पुरेशा प्रमाणात उत्पादन होत नाही, उद्योगधंद्यांना आवश्यक कच्चामाल पुरवण्याच्या दृष्टिकोनातून शेतीचा विकास होत नाही, उद्योगांचे व्यवस्थापन, कामगारांचे औद्योगिक संबंध योग्य पद्धतीने सोडविले जात नाही. भारतीय अर्थव्यवस्थेला शेतीप्रधान व्यवस्थेपासून दूर नेणे शक्य नसल्यामुळे शेती विकास हा औद्योगिक दृष्ट्या व शेतीच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याचा विचार त्यांनी मांडला. जमीन सुधारणा योजना मागे पडत असल्यामुळे शेतीचा विकास होत नाही. जमीन सुधारणेबाबत पुरेशी काम का होत नाही यासंदर्भात त्यांनी अर्थमंत्री असताना 1972 मध्ये डॉ. राज यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून शेतीवरील प्रत्यक्ष कर योजनेचा आढावा घेतला. शेती विकासासाठी खर्च झालेला पैसा हा ग्रामीण क्षेत्रातील शेती उत्पादनातून बाहेर आला पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. राज समितीने जमीन धारण क्षेत्रावर कर बसावा असे सुचविले होते. त्यानुसार हरियाणा, हिमाचल प्रदेश सरकारने कायदे केले. राज्यांची आर्थिक स्थिती चांगली राहण्यासाठी पाटबंधारे योजनेतील आर्थिक तूट भरून काढण्यासाठी प्रत्येक राज्याने पाट बंधाऱ्यातून दिल्या जाणाऱ्या पाण्यावर कर बसवून तूट भरून काढावी अशी शिफारस यशवंतरावानी प्रत्येक राज्याला केली.

**करविषयक धोरण आणि कृषी विकास**

जास्तीत जास्त रोजगाराची उपलब्धता, लघु उद्योगधंद्यांना प्रोत्साहन, ग्रामीण भागातील अंकुशल कामगारांना त्यांच्या पात्रतेनुसार उद्योग व सेवा क्षेत्रात सामावून घेणे, बेकारी कमी करण्यासाठी शिक्षणाची पुनर मांडणी महत्वाची असल्याचे त्यांचे मत होते. जमीनदार व ठराविक शेतकरी हरित क्रांतीमुळे श्रीमंत होतात. त्यामुळे आर्थिक विषमतेत वाढ होते. अल्पभूधारक शेतकऱ्यांपर्यंत शेतकऱ्यांच्या योजना पोहोचत नाहीत. उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यातून रोजगार निर्मिती होण्यासाठी व्याजाचा दर 8 टक्के वरून 7 टक्क्यावर आणला. उद्योगधंद्यातील मक्तेदारी कमी करण्यासाठी लघु व मध्यम उद्योगांना परवानगी देण्याचा मार्ग स्वीकारला. देशाच्या आर्थिक व्यवस्थांनी समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेला हातभार लावला पाहिजे. कराची अंमलबजावणी आणि त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून देशाचा विकास साध्य करता येतो. देशातील काळा पैसा, चलनवाढ, साठेबाजी यासारख्या बाबीवरती कर धोरणाच्या माध्यमातून नियंत्रण आणता येते. 1971-72 या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकीय भाषणामध्ये यशवंतरावांनी करविषयक धोरणाची त्रिसूत्री जाहीर केल्याचे आढळून येते. कर विषयक धोरण राबविताना उत्पन्नातील विषमता कमी करणे, कर योजनेचा पाया

विस्तृत करणे व कर आकारणी व वसुली यांची प्रशासन यंत्रणा अधिक कार्यक्षम करणे या तीन बाबींना त्यांनी अधोरेखित केल्याच्या दिसते. यशवंतरावांनी वित्तमंत्री पदाचा कारभार घेण्यापूर्वी वांछू समितीने 1968-69 या काळात उत्पन्न कर चुकविणाऱ्या मिळकतीचे मूल्य अंदाजे रुपये 1400 कोटी रुपये तर डॉ. रागनेकर यांनी अंदाजे रुपये 2833 कोटी असल्याचे सांगितले. काळा पैसा आणि चलनवाढ कमी करण्यासाठी यशवंतरावांनी प्रयत्न केल्याचे दिसून येते. 1970-71 या वर्षांमध्ये प्राप्तिकर खात्यामार्फत 195 झडत्या झाल्या व त्यातून 140 लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली. 1973-74 मध्ये प्राप्तिकर खात्यामार्फत 395 झडत्या झाल्या आणि त्यातून 327 लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली. त्यांच्या अर्थमंत्री पदाच्या काळामध्ये काळ्या पैशावरती नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावीपणे यंत्रणा कार्यान्वित केल्याचे दिसून येते.

**राज्य सरकार आणि ओव्हरड्राफ्ट**

देशातील अनेक राज्याची आर्थिक स्थिती कमकुवत आहे. आरोग्य, शिक्षण आणि वेगवेगळ्या कल्याणाच्या योजनामुळे तसेच दुष्काळ, महापूर यासारख्या आपत्तीमुळे राज्याचे आर्थिक दायित्व वाढते. यशवंतराव चव्हाण यांनी प्रत्येक राज्य सरकारशी चर्चा करून त्या राज्यांच्या आर्थिक समस्या व त्यावरील उपाय योजनाचा आढावा घेतला आणि त्यावर शिस्त आणण्याचा आणि खर्चाचे नियमन करण्याचा प्रयत्न केल्याच्या आढळून येते.

**भारतीय नियोजन संदर्भात मत**

नियोजना संदर्भात खालील बाबींची मांडणी यशवंतरावांनी केल्याच्या आढळून येते.

1. आर्थिक क्षेत्रात विचारपूर्वक धोरण ठरवून त्याची अंमलबजावणी करण्यास पुरेसा अवधी दिला पाहिजे.
2. विकासाच्या ज्या क्षेत्रात आपण भांडवली गुंतवणूक करत आहोत त्यामध्ये सातत्य चालू ठेवले पाहिजे.
3. ज्या क्षेत्रात भांडवल गुंतवले आहे त्याचा पुरेपूर क्षमतेने वापर होत आहे किंवा नाही यावर ती सतत लक्ष ठेवले पाहिजे.
4. औद्योगिक संस्थांतील औद्योगिक संबंध यामध्ये काही अडचण असेल तर तात्काळ लक्ष दिले पाहिजे.
5. आर्थिक विकासात सामाजिक न्यायाला प्राधान्य द्यावे. प्रादेशिक समतोल विकासाला प्राधान्य द्यावे.
6. औद्योगिक उत्पादनामध्ये कामगारांचा हिताचा विचार करून वेतन व हक्क मान्य करावे. समाजाला लागणाऱ्या आवश्यक वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणात करणे आवश्यक आहे.

**सारांश**

कृषी क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टिकोनातून यशवंतराव चव्हाण यांचे विचार महत्त्वपूर्ण असल्याचे दिसून येतात. त्यांचे गोवंश बंदी विधेयका संदर्भातील विचार, कृषी शिक्षणाची आवश्यकता, कृषी विकासासाठी पाणी व विजेची उपलब्धता, सहकारी संस्थांची भूमिका, बँकांच्या राष्ट्रीयीकरणा संदर्भातील विचार, शेतीच्या विकासामध्ये कर आणि व्याजदराची भूमिका, आधुनिक बी बियाणे खतांची आवश्यकता या बाबी महाराष्ट्राच्या कृषी विकासामध्ये महत्त्वपूर्ण ठरल्या आहेत.

**संदर्भसूची**


1. युगपुरुष यशवंतराव चव्हाण, संपादक डॉ. प्रतिभा पाटील, प्राध्यापक अंबादास आरगडे, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, 2014.
2. भाग्यविधाता, मुख्य संपादक प्राचार्य डॉ. आर. टी. बेंद्रे, प्रा. एच.पी. कदम, न्यू मॅन पब्लिकेशन, 2014.
3. प्रतिष्ठान, यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी विशेष अंक, जानेवारी - फेब्रुवारी व मार्च - एप्रिल 2013.
4. यशवंतराव, राष्ट्रीय व्यक्तिमत्व, संपादक भा. कृ. केळकर, कल्पना मुद्रणालय, पुणे, 1985.
5. यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार, संकलन श्री. ना. धो. महानोर, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई.
6. थोरले साहेब, प्रा. डॉ. विजय पाथ्रीकर कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, 2010.
7. https://yashada.org/yashada_2019/index.php
8. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे संकेतस्थळ https://ycmou.ac.in
9. यशवंतराव चव्हाण सेंटरचे संकेतस्थळ https://chavancentre.org
10. एबीपी माझाचे संकेतस्थळ https://marathi.abplive.com/news/maharashtra/what-exactly-did-the-ban-on-cow-slaughter-achieve-in-maharastra-822896
11. यशवंतराव चव्हाण यांचे विधिमंडळातील भाषणे.
12. मी पाहिलेले यशवंतराव, संपादिका डॉ. सरोजिनी बाबर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, 1988.

MAH MAR 34737/13/1/2009-TC
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण घेऊन निघालोय...



आयुष्याची लढाई लढताना
दुःख आणि यातनांचे
डोंगर पार करून मी चालत गेलो ही खडतर वाट
कुणी काटे पेरले वाटेत
तर काहींनी स्पीड ब्रेकर उभे केले
पावला पावलावर...
वैशाखी उन्हाच्या झळा सोसत
मी अनुभवलाय हरेकदा दुष्काळ दाह
मायबापांच्या कष्टाचा
पाढा वाचीत गेलो
आयुष्याची बेरीज-वजाबाकी समजून घेऊन...
जगण्याचं गणित सोपं व्हावं म्हणून
जायबंदी करून पायात
कोलदांडा घालण्याचे प्रयत्नही झालेत
नाही असे नाही...
नजरकैदेचा खडा पहाराही सोसावा लागला...
जगण्याच्या या अनामिक वाटेवर
कोणत्याही लाटेवर स्वार
व्हायला आवडलेच नाही मला
मला तोडायचे होते पिढ्यानपिढ्या
आमच्या पायात अडकवलेल्या
अमानुष, अन्यायी बेड्या
तोडायचे होते बलदंड, बेफाम बेलगामी
बेजबाबदार साखळदंड...
शब्दांनीच हाक देऊन उठवलं अन
पायात बळ भरलं चालण्याचं

मग मी चालत राहिलो अडखळत
कधी चाचपडत तर कधी सावध बेसावध
वाटा आडवाटा तुडवत
मी निघालोय प्रज्ञा सूर्याच्या दिशेनं...
इथल्या बिचेहऱ्यांच्या माणसांच्या
जगण्याला अर्थ प्राप्त व्हावा म्हणून
हे नांगरूप पडलेलं रान
वहिती करण्यासाठी एकवटून, एकजुटीने
तिफन घेऊन निघालोय मी
या उघड्या बोडक्या माळरानात
विचारांची पेरणी करून
एका दाण्याचे हजारो दाणे करण्यासाठी...

- शिवाजी हुसे